'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I– Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

# आधुनिक साहित्यातील प्रवाह : जनवादी साहित्य

**प्रा. सूर्यवंशी संगीता**
मराठी विभाग प्रमुख
के. आर. एम. महिला, कला व वाणिज्य महाविद्यालय,
नांदेड.
मो. ९९७०७९८८७८

जन साहित्याची संकल्पना ही अलिकडच्या काळात मांडली जात असली तरी या साहित्याची परंपरा मात्र फार जुनी आहे. मानवी स्वातंत्र्य, माणसाच्या मोठेपणाची सुक्ते ही प्राचीन काळापासून सातत्याने गायिली जात आहेत. जन हा शब्द आज त्याचा मूळचा समता सूचक अर्थ हरवून बसला असला तरी त्याच्यातील स्फोटक अर्थ हा आपल्या लगेच ध्यानात येतो. प्राचीन काळात सामुहिक उत्पादन व त्याचा समान उपभोग या तत्वानुसार जीवन जगणाऱ्या मानवसमूहांना शोषणाच्या प्रक्रियेत सहभागी न होणारा व समता स्वातंत्र्याची पूजा करणारा लोकसमूह म्हणजे गण.

विषम व्यवस्थेच्या आरंभापासून व वर्गीय समाजाच्या निर्मितीपासून गणांचे मूळ स्वरूप नष्ट झाले आणि जन ही संज्ञाच शिल्लक राहिली. त्यामुळे फक्त शोषित व अन्यायग्रस्त समाजाच्या बाबतीतच याचा वापर होऊ लागला. अशा अभावग्रस्त व पिडीत लोकांचे चित्रण करणारे त्यांच्या व्यथा वेदनांना साकार करणारे त्याच्या मुक्ति लढ्यांना कलारूप प्रदान करणारे साहित्य म्हणजे जनसाहित्य.

जनसाहित्याची संकल्पना ही सर्वार्थानी लैकिक आहे म्हणजे ती पूर्णत: भौतिकच आहे. कारण सामान्य माणसाचा ईश्वर हा आदर्शवादी तत्वावर, निष्ठांवर आधारित नसतोच. कारण ती माणसे आपले जीवन सुंदर व अर्थपूर्ण करण्यासाठी ती आयुष्यभर संघर्ष करतात. पण त्यावेळी आपली मानवीय वृत्ती साबूत ठेवतात त्यांच्यासाठी देवाचे अस्तित्व हे आधारापुरते व दुय्यम असते. केंद्रस्थानी मात्र माणूसच असतो.

सृष्टी व तिचे व्यापार, मानवी जीवन व त्यातील अपरिहार्यपणे निर्माण होणारी गुंतागुंत व त्यातील परस्पर संबंध या गोष्टी म्हणजे प्रतिभावंता समोरील जटिल आव्हाने होत. त्यांचा अर्थ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न हा प्रत्येक कालखंडातील साहित्यिकांनी केला आहे. वाङ्मय निर्मितीचा मूलाधार म्हणजे जीवन शोध; परंतु यामागील जाणिवा या नेहमीच जननिष्ठ होत्या वा आहेत, असे मात्र म्हणता येणार नाही.

लेखकांच्या जाणिवांवर सर्वाधिक प्रभाव, गाजविणारा तात्विक विचार म्हणजे नियतिवाद यापुढे माणूस हतबल स्वातंत्र्यविहिन व पराधिन होतो. कारण नियतिवादाचा प्रभाव हा अगदी प्राचीन काळापासून प्रत्येक देशाच्या सर्वच साहित्यात आपल्याला आढळून येतो. त्यांच्या कलाकृतीमध्ये नियतिविरूद्ध माणूस असा संघर्ष आहे. परंतु त्याची मानवीय वृत्ती मात्र नष्ट होत नाही. ज्या मानवी चेतनेच्या साहय्याने (Human Sprit) मनुष्य आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी आयुष्यभर झगडतो ती त्याची चेतना महत्वाची आहे. ती कधीच पराभूत होत नाही. कारण ती अविनाशी अमर आहे. ती माणसे पुन्हा नव्या उमेदीने उभी राहतात, त्यांचे माणूसपण हे अधिक तेजस्वी बनते. त्यामुळे आपल्या मनाचे उदात्तीकरण होते.

मानवाच्या वाट्याला येणाऱ्या सुख - दु:खाना त्याच्या बऱ्या वाईट स्थितीला ही अदृश्य शक्तीच जबाबदार असते असा गैरसमज आहे. मानवाच्या हातात काहीच नसते. पण सामाजिक - आर्थिक परिस्थितीचा त्याच्या निर्माण झालेल्या स्थितीचा

काही संबंध नसतो. कारण मराठी साहित्य जाणिवेवर प्रभाव गाजविणारा दुसरा तात्विक विचार म्हणजे कर्मफल हा सिद्धांत आहे. माणसाच्या स्थितीचे, त्याच्यातील श्रेष्ठ - कनिष्ठतेचे स्पष्टीकरण व समर्थन करण्यासाठी या विचाराचा उपयोग हा हिंदू समाजात हजारो वर्षापासून केला जात आहे. या विचाराचा प्रभाव प्राचीन भारतीय साहित्यावरच नव्हे तर प्रस्थापित आधुनिक साहित्यातही मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

आधुनिक काळातील विज्ञानाच्या व बुद्धिप्रामाण्यवादाच्या वाढत्या प्रभावाबरोबर नियतिवाद प्रारब्धवाद व कर्मफलवाद यारख्या सिद्धांताचा प्रभाव क्षीण होणे हे अपरिहार्यच होते. परंतु या विषय समाजव्यवस्थेत प्रस्थापित वर्ग आपली शक्ती व प्रभाव कायम ठेवण्यासाठी नवनवीन साधने शोधत असतात व वेळप्रसंगी निर्माणही करतात. त्यामुळे हजारो वर्षापासून माणसाचे संवर्धिलेल्या नैतिक व सामाजिक मूल्यांना कोणताच अर्थ प्राप्त होत नाही. परंतु हे सर्व जनसाहित्याला मान्य नाही. कारण जननिष्ठ जाणिवांना तात्विक आधार असतो.

मानवी जीवन, मनुष्याची अनुवंशिकता व सभोवतालच्या परिसर यांच्यामुळे निश्चित होते. बळी, धग, माणसे, रथचक्र, गोतावळा, पाचोळा या कांदबऱ्यातील - आबा, कौतिक, शंकर, नारबा व गंगाराम ही पात्रे आपल्या परिसरांशी अतूटपणे बांधली गेली आहेत. ही मानसे उठता - बसता देवाची करूणा भाकतात. या सर्वांमधून त्यांना एक प्रकारचे मानसिक बळ, सुरक्षित पणाची भावना मिळते ते आपल्यापरीने व आपल्याच ताकदीनुसार जीवनात अर्थ प्राप्त देण्यासाठी त्यांचा संघर्ष चालूच असतो. यामुळे त्यांच्या विचारांना, आचारांना, व्यवहारांना, महत्वाकांक्षांना, समज - असमजांना एक विशिष्ट रूप प्राप्त होते ते कसे ? कारण व्यक्तीची मानसिकता ही सभोवतालच्या समाजव्यवस्थेने हजारो वर्षापासून जोपासलेल्या मूल्य संस्कारावर वाढलेले आहे.

म्हणून लेखकांनी आपली निर्मिती काही एका विशिष्ट तत्वज्ञानाचे होकायंत्र समोर ठेवून करावी असे मुळीच नाही. भारताच्या सर्वच जीवनपद्धतीवर पाश्चिमात्याचा प्रभाव पडलेला असल्यामुळे त्यांच्या सयोगातून व संघर्षातूनच आधुनिक भारतीय साहित्याचा जन्म झाला आहे. त्यामुळे मराठी साहित्य ही त्याला अपवाद नाही. म्हणून कोणत्याही साहित्य कृतीचे आंतरिक स्वरूप हे तिच्या मूळाशी असलेल्या जाणिवेच्या स्वरूपावरूनच निश्चित होते.

ही व्यवस्थाच मूळात अजव आहे. ती असंख्य माणसांना अस्पृश्य म्हणून गावकुसाबाहेर ठेवते. शहरी असो वा ग्रामीण अगदी सर्व श्रमिक वर्गाचे, सर्व श्रमिक वर्गाचे शोषण करून त्यांना संस्कृती व संपन्नता यापासून दूर ठेवते. परंतु प्रस्थापित्तेतर लेखक हे मात्र शोषित व वंचितांच्या अशा अकांक्षाचा व व्यथा वेदनांचा कलात्मक अविष्कार करतात.

मराठी साहित्यात अभिजनवादीचा प्रभाव हा प्रबळ राहिला तरी ही परिवर्तनवादी मात्र डगमगले नाहीत. कारण अर्वाचीन कालखंडाची सुरूवातच मुळात या प्रवृत्तीतून झाली आहे.

स्वातंत्र्यानंतर म्हणजे १९६० नंतरच्या काळात अनेक प्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाले. पण त्यांनी ग्रांथीक भाषा नाकारून बोलीभाषेत आपापल्या समाजाच्या अस्मितेची प्रतिष्ठापना करीत असतानाच या प्रवाहांनी मराठी साहित्याला नवे वैभव मिळवून दिले. पण एकाएकी झाले नाही. त्यांना एक चळवळीचे व विचाराचे स्वरूप प्राप्त झाले. पण अनेक लेखकांच्या कलाकृतीतून नवे भान येत होते. कारण त्या साहित्याचा जन्म हा चळवळीतून झाल्यामुळे विलक्षण तेजस्वी होते व वेगळेपणाचे वैभव होते. परिस्थितीवर व आजच्या विचारधारेवर मात करण्याच्या गरजेतूनच जनसाहित्याचे प्रयोजन निर्माण झाले. ती कुणा एका व्यक्तीची व गटाची इच्छा नसून ती एक वस्तुनिष्ठ अशी सामाजिक गरज आहे.

जनसाहित्य हे मार्क्सवाद, ग्रामीण व दलित साहित्याच्या विरोधात मूळीच नाही. त्यांचे ऋण - त्यांचे मोठेपण - त्यांचे योगदान या सर्वांची दखल घेऊन आपली भूमिका व्यापक करण्याचा प्रयत्न करते. कारण जनसाहित्याची भूमिका ही समग परिवर्तनाची आहे. परंतू त्याबरोबर ते प्रत्येक कालखंडातील जननिष्ठ प्रवृत्तीचे वाङ्मयीन अविष्कार हे आपलेसे वाटतात. तसेच कुठल्याही प्रवाहात मर्यादेत न बसणारे परंतु निखळ मानव प्रेमातून जन्माला आलेले साहित्य जवळचे वाटते.

नव्या व वर्तमान जननिष्ठ जाणिवांसहित आपण सामोरे गेलो तर उच्च प्रतीच्या कलानंदाबरोबरच आपल्या मनात परिवर्तनाच्या प्रेरणा निर्माण होतात. जनसाहित्य या सगळ्या बंधनाच्या पलीकडे जाऊन संबंध मानवताच आपल्या कवेत घेते. माणसांना विभागणाऱ्या घोषणा टाळून त्यांना एकत्र आणण्याची व कलात्मकतेशी कुठेही प्रतारणा न करता जननिष्ठ जाणिवांनी घडवलेले जीवनदर्शन म्हणजे जनसाहित्य.

जनसाहित्याची भूमिका ही अधिक व्यापक व गुणसंग्राहक असल्यामुळे परंपरेतील अनुकुल भाग हा नाकारला तर त्यातून लाभापेक्षा तोटा च अधिक होईल. परंतु तत्कालीन समाजिक वास्तवाच्या सर्व अटळ असणाऱ्या मर्यादा स्वीकारूनही त्यांच्यापैकी अनेकांनी अमर व चिरंजिवी ठरणाऱ्या कलाकृती निर्माण केल्या.

परंतु कलाकृतीचे तर्कशुद्ध व निर्विकल्प बुद्धीने आपण अवलोकन केले तर राम - रावण - सीता - कृष्ण - अर्जून - दौपदी - दुष्यंत - शंकुतला - युजिसीस - इंडिपस - हॅम्लेट - लीअर यांच्या उच्च स्थानामुळे रसनिष्पन्नी होत नसून ती त्यांच्यातील शुद्ध मनुष्याच्या शोध घेण्यातून ही रजे निष्पत्ती होते. सामाजिक दर्जा संबधीचे दावे हे काहीही असले तरी ही प्राचीन काय किंवा आधुनिक काय ? श्रेष्ठ कलाकृतीतून हा वेध घेतलेला असतो, तो मानवी जीवनाचा, सर्व बाह्य परिस्थिती बरोबरच त्यांच्यातून व्यक्त झालेला माणूसच अविष्कृत होतो म्हणून त्या श्रेष्ठ कलाकृती ठरतात.

जनसाहित्य म्हणजे जनसामान्यांच्या जीवनाचा घेतलेला शोध असे आपण मानतो कारण जीवनशोध हेच कुठल्याही श्रेष्ठ साहित्याचे मुख्य लक्ष्य असते. त्यामुळे कोणत्याही वैश्विक मूल्य असलेल्या साहित्य कृतीची निर्मिती ही समाज निरपेक्ष होऊ शकत नाही. कारण मानवी जीवनाचे स्वरूप हे अथांग व विश्वासारखे गुढ असते. हे मान्य करून ही त्याचे सारभूत लक्षण सांगताच येत नाही असे नाही.

त्यासाठी आपल्याला पुढील गोष्टींची नोंद घेणे आवश्यक आहे.

१. सौंदर्यशास्त्राचे स्वरूप हे केवळ आशयवादी वा केवळ आकृतिवादी असे नसते. कारण श्रेष्ठ कलाकृतीत आशय व रूप या गोष्टी एकात्म पावलेल्या असतात.

२. केवळ अनुभवाला सामोरे जाण्याने श्रेष्ठ कलाकृती निर्माण होत नाही. या अनुभवाचे जाणिवेत रूपांतर करणारी संवेदनशिलता मानव निष्ठ असणे आवश्यक आहे.

३. जीवनवाद व आकृतीवाद यांच्यात जो विकल्प वा विग्रह कल्पिल्या जातो. तो भ्रामक असतो. जनवादी आशय असलेली कलाकृती हा श्रेष्ठ आकृतिमूल्य घेऊनच जन्माला येते.

**संदर्भ :-**

१. द. भि. कुलकर्णी अभिनंदन ग्रंथ : संपादन - मृणालिनी पाटील, ज्योती अंजेवार, मदन धनकर

२. समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह : कुलकणी द. भि. - मढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुन:स्थापना.